bluebytes
news that matters

Friday, May 28, 2010

**New craze about smoking in young girls**

Publication: Prahar, Edition: Mumbai, Journalist: Bureau, Page No: 3, Location: Bottom-Right, Width(cms): 24, Height(cms): 9, Size(sq.cms): 216

# तरुणींमध्ये धूम्रपानाची नवी क्रेझ




**मुंबई (प्रतिनिधी) :** हातात खुळखुळणारा पैसा, ताणतणाव, आयुष्याबद्दल बेफिकिरी, मोकळा वेळ घालवण्याचे सोपे साधन, सहकाऱ्यांमुळे लागलेली सवय... अशा अनेक कारणांमुळे धूम्रपानाची क्रेझ तरुणांमध्ये, विशेषतः महिलांमध्ये वाढताना दिसत असल्याचे वास्तव समोर आले आहे. सोमवारी, ३१ मे रोजी जागतिक तंबाखू विरोधी दिन साजरा होत आहे. त्यानिमित्त केलेल्या सर्वेक्षणांत ही बाब दिसून आली.

टाटा मेमोरिअल रुग्णालयाच्या प्रिव्हेंटिव्ह ऑन्कोलॉजी विभागाचे सल्लागार डॉ. गौरवी मिश्रा आणि 'डॉक्टर्स फॉर यू' या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. रविकांत सिंग यांनी दोन स्वतंत्र सर्वेक्षणे करून बीपीओ आणि कॉल सेंटरमध्ये काम करणाऱ्यांमधील धूम्रपानाचे प्रमाण, कारणे, पद्धती, दुष्परिणाम आणि उपाय यावर प्रकाशझोत टाकला आहे. वर्षभरात डॉ. गौरवी मिश्रा यांनी चार बीपीओमधून ८००हून अधिक कर्मचाऱ्यांची माहिती गोळा केली. त्यात कॉल सेंटरमधील ८ टक्के महिलांना धूम्रपानाची आवड असल्याचे आढळले. हे धूम्रपान मधल्या सुट्टीत केले जाते. कित्येक मुली 'चेनस्मोकर' असतात तर कित्येकींना केवळ विरंगुळा म्हणून सिगारेटची तल्लफ भागवायची असते. सर्वसाधारणपणे २० ते २५ वयोगटातील महिलांमध्ये धूम्रपानाची क्रेझ आढळते. कित्येकदा बीपीओ कर्मचारी हुक्का बारमध्ये जातात, अनेक जण कार्यालयाच्या कॉरिडोरमध्ये किंवा वॉशरूममध्ये धूम्रपान करताना दिसतात.

धूम्रपानामुळे शरीरावर होणाऱ्या परिणामांची माहिती घेण्याची उत्सुकताच कित्येकांना नसते. त्यांना खोकला, घशातील जंतुसंसर्ग, दमा, धाप लागणे, आवाज बिघडणे, ॲसिडिटी हे आजार वारंवार होत असल्याचेही या पाहणीत दिसून आले. चार बीपीओ केंद्रातील पुरुष कर्मचाऱ्यांमध्ये ८० टक्के तर महिला २० टक्के धूम्रपान करत असल्याची माहिती सर्वेक्षणातून स्पष्ट झाली.

दुसरीकडे डॉ. रविकांत सिंग यांनी १५ आघाडीच्या प्रिंट, इलेक्ट्रॉनिक आणि जाहिरात आस्थापनांमधील सुमारे दीड हजार पत्रकारांचा सर्व्हे केला. त्यात गेल्या काही वर्षांत मीडियातील धूम्रपान करणाऱ्या महिलांची संख्या ५ टक्क्यांवरून ३५ टक्क्यांवर गेल्याची धक्कादायक आकडेवारी समोर आली. आकर्षण, सवय, बेफिकिरी, तणाव, कामाचा ताण, जेवणाच्या अनियमित वेळा अशी अनेक कारणे सांगितली गेली. ॲक्टिव्ह आणि पॅसिव्ह धूम्रपानाचे भीषण परिणाम युवा पिढीवर होताना दिसताहेत. यासाठी 'स्मोक फ्री मुंबई कॅम्पेन'सारख्या योजना राबवण्यात आल्याची माहिती डॉ. सिंग यांनी दिली. या कॅम्पेनसाठी मुंबई महापालिका, सलाम बॉम्बे फाऊंडेशन, टाटा मेमोरिअल रुग्णालय, हेलिस सेखसारिया इन्स्टिट्यूट फॉर पब्लिक हेल्थ, कॅन्सर पेशंट्स एड असोसिएशन, व्ही-केअर, टाटा स्टील, आहार आणि अमेरिकेअर्स या संस्थांही सहभागी झाल्या आहेत.